**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : समिती २०१५/प्र.क्र.४३४/भाग-१/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ डिसेंबर, २०१६.

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण
तथा सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :- कायम विनाअनुदानित विशेष शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शिक्षण शुल्क निर्धारणाबाबत..**

**संदर्भ** :- (१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.शुल्क-२०१५/ प्र.क्र. ४३४/१५/मशि-२,दिनांक १९ जानेवारी, २०१६.
(२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडील पत्र क्रमांक उशिसं/२०१५/शुल्क-५२१५/प्र.क्र.४३४/बी.एड/११९५२, दि. १४.१०.२०१६.

संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. संदर्भाधिन क्र. २ येथील आपल्या पत्रान्वये सादर केलेल्या अभिप्रायानुसार सदरहू शिक्षण शुल्क समितीच्या कार्यकक्षेमध्ये, भारतीय पुनर्वास परिषदेची मान्यता असणाऱ्या व कायम विनाअनुदान तत्वावर बी.एड विशेष शिक्षण अभ्यासक्रम चालविणाऱ्या अध्यापक महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्याची बाब समाविष्ट करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या व शिक्षण शुल्क समिती यांच्या संगणक संकेतस्थळावर आवश्यक सूचना प्रसिध्द करुन, शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून राज्यातील कायम विनाअनुदानित विशेष शिक्षण बी.एड अभ्यासक्रमांच्या शिक्षण शुल्क निर्धारणाबाबतची आवश्यक कार्यवाही करावी.

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**